| Published Date: | 13 Oct 2018 | Publication: | Navshakti (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Mumbai | Page No: | 22 |
| MAV/CCM: | 6846/11.41 | Circulation: | 93000 |

# आदित्य अग्रवाल आणि करण नागदेव यांनी जिंकली 'टीसीएस आयटी विझ'

मुंबई - टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने आयोजित केलेल्या टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेत मुंबईतील ८५० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला. बॉम्बे स्कॉटिश स्कूल, पवई या शाळेतील आदित्य अग्रवाल आणि करण नागदेव यांनी टीसीएस आयटी विझ २०१८ची मुंबई आवृत्ती जिंकली आहे. ७ ऑक्टोबर रोजी इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह, लिलावती हॉस्पिटलसमोर, वांद्रे रीक्लेमेशन, मुंबई येथे ही स्पर्धा आयेजित करण्यात आली होती. मुंबई पर्वात नाशकातील विविध शाळांमधील २५ संघही सहभागी झाले होते.